8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# गोवंश चोरी करुन मांस विक्रीचा गोरखधंदा!

## दोन सराईत गुन्हेगार जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेचे कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील विविध भागातून गोवंश चोरी होण्याच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत चालली होती. यातच विविध पोलीस ठाण्यात अज्ञातांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आलेले होते. मध्यरात्रीच्या सुमारास जनावरांना चारचाकी वाहनांत कोंबून चोरी करण्यात येत होती. गोवंश चोरीच्या वाढत्या घटनेमुळे पोलीसांच्या कार्यक्षम ेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असतांनाच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मालेगाव येथील दोघांना सिल्लोड येथून ताब्यात घेतले आहे. हे सराईत गुन्हेगार गोवंशाची चोरी करून त्यांची मास विक्रीचा अवैध व्यवसाय करत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी दिली आहे. या दोघांच्या ताब्यातून **पान २ वर**





मंम्मादेवी येथे अश्व रूढ महाराणा प्रताप यांचा पुतळा शुक्रवार (दि २८) रोजी उत्सव समितीतर्फे बसवण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे. (छायाचित्र - किरण खानापुरे)

## ६ महिन्यापासून थकित ओबीसी हॉस्टेलच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, भोजन, वस्त्र, व शैक्षणिक साहित्याचा भत्ता द्या

**जालना । प्रतिनिधी -** ओबीसी हॉस्टेलच्या विद्यार्थाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले गेल्या ६ महिन्या पासून विद्यार्थ्यांच्या खात्यावर शैक्षणिक, भोजन वस्त्र, व शैक्षणिक साहित्य भत्ता आला नसल्याने विद्यार्थ्यांवर म ोठय़ा प्रमाणावर उपासमारीची वेळ आली आहे, सर्व विद्यार्थ्यी हे गरीब व शेतमजूर कुटुंबामधून आलेले आहेत एकवेळचे जेवण करून ते आपल शिक्षण घेत आहेत, हतबल झालेले शेतकरी म ाय बाप आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी अहोरात्र काम करून आपल्या मुलांना शिकवत आहेत, ह्या महा युतीच्या सरकार ने ठरवले आहे की सर्व युवा पिढीला बेरोजगार करुन ठेवणार, जर दोन दिवसात विद्यार्थ्यांच्या खात्यात शैक्षणिक भत्ता पडला नाही, तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आंदोलन करण्याचा इशारा दिला यावेळी काँग्रेस महिला जिल्हाध्यक्षा नंदा पवार , जिल्हा सरचिटणीस गणेश चांदोडे, **पान २ वर**









# दोषी राजकारण्यांवर निवडणूक लढण्यावर आजीवन बंदी का नाही?

गुन्हेगार हा गुन्हेगारच असतो कारण गुन्हा हा लहान-मोठे अशा पध्दतीने ठरविला जात नाही.त्यामुळे सर्वसामान्यांनी केलेला गुन्हा असो अथवा राजकारण्यांनी केलेला गुन्हा असो यांना समान वागणूक व समान शिक्षा व्हायला पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. ही बाब राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.परंतु देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की, राजकीय पुढाऱ्यांनी आपल्या स्वार्थासाठी आपल्या पध्दतीने नियम व कायदे बनविल्याचे दिसून येते.त्यामुळे अनेक राजकारणी बाहुबली या नावाने ओळखले जाते.सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडून दोषी खासदार आणि आमदारांना निवडणूक लढण्यास कायमची बंदी घालावी का,यावर उत्तर मागितले होते.या प्रकरणी केंद्र सरकारने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. प्रत्युत्तरादाखल,असे म्हटले गेले की गुन्हेगारी प्रकरणांमध्ये दोषी ठरलेल्या राजकारण्यांना शिक्षा भोगल्यानंतर आयुष्यभर निवडणूक लढवण्यास बंदी घालता येत नाही.या प्रतिज्ञापत्रावरून असे लक्षात येते की,केंद्र सरकारने सादर केलेले प्रतिज्ञापत्र फक्त राजकारण्यांच्याच फायद्याचे असल्याचे दिसून येते व यावरून स्पष्ट होते राजकारणी गुन्हेगार आणि सर्वसाधारण गुन्हेगार यात जमीन-आसमानचा फरक आहे हे सरकार प्रतिज्ञापत्रा सिध्द केल्याचे दिसून येते. आपण अनेकदा पहाले सर्वसाधारण गुन्हेगारांना थर्ड ग्रेडची वागणूक दिली जाते आणि राजकीय गुन्हेगारांना किंवा राजकारण्यांना व्हिआयपीची ग्रेडची वागणूक दिली जाते ही सर्वात मोठी तफावत राजकारणी आणि सर्वसामान्यांच्या गुन्हेगारीमध्ये दिसून येते.सध्याच्या परिस्थितीत कोणत्याही सरकारी कामाकरीता पोलिस व्हेरिफिकेशन असने गरजेचे असते आणि केलेही पाहिजे.यातुन हे सिद्ध होते की त्या व्यक्तींवर काही गुन्हा तर दाखल झाला नाही ना! यामध्ये विद्यार्थी, सर्वसामान्य,नौकर वर्ग, व्यापारी, व्यावसायिक, नौकरीसाठी आवेदन करणारे बेरोजगार युवक यांच्या पोलिस व्हेरिफिकेशनमध्ये जर कोणताही छोटा-मोठा गुन्हा आढळला तर त्याचे संपूर्ण आयुष्य धुळीस मिळते.हालाकी त्याने आपल्या गुन्हेगारी प्रवृत्तीला तिलांजली जरी दिली असली तरीही त्याला कायद्याच्या माध्यमातून गुन्हेगार ठरविण्यात येतो.परंतु राजकारणी जेव्हा अनेक गुन्ह्यांनी लथपथ होतात तेव्हा ते अनेक पळवाटा शोधतात व तो मार्ग त्यांना सहज अवगत होतो. कारण कायदे बनविणारे राजकारणीच असतात त्यामुळे आपल्या सोयीनुसार कायद्यात उलटफेर करून आपल्या हिताचे करतात.ड.अश्विनी उपाध्याय यांनी २०१६ मध्ये जनहित याचिका दाखल केली होती.यामध्ये लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम ८ आणि ९ च्या संवैधानिक वैधतेला आव्हान देण्यात आले आहे. याचिकाकर्त्याच्या वतीने असे म्हटले होते की राजकीय पक्षांनी स्वच्छ प्रतिमेचे लोक का शोधू शकत नाहीत,हे स्पष्ट करावे अशी मागणी याचिकेत केली आहे.मी याचिकाकर्त्यांच्या मताशी पुर्णपणे सहमत आहे.कारण देशात असलेल्या गुन्हेगारांना जर राजकीय पक्ष प्रथम प्राधान्य देत असेल व खतपाणी घालत असेल आणि अशा परिस्थितीत त्यांना स्वच्छ प्रतिमेचा व्यक्ती दिसत नसेल तर ही कसली लोकशाही म्हणावी!आज देशात हजारो गुन्हेगारांनी राजकारणात प्रवेश करून आमदार खासदार मंत्री बनुन लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी झाल्याचे दिसते ही बाब लोकशाहीला घातक आहे.आज सर्वसामान्यांनी थोडासाही गुन्हा केला तर त्यांच्यावर कठोर कारवाई करून तुरूंगात डांबले जाते व त्यांच्या परिवाराची उलटसुलट तपासणी करून टॉर्चर केले जाते. परंतु याबाबतीत राजकीय पुढाऱ्यांबाबद मात्र शिथिलता दिसून येते.हा सर्वसामान्यांवर अन्याय नाही का? यावरून स्पष्ट होते की राजकीय पुढारी आपल्या हिताप्रमाणे कायद्यात बदल करून आपली राजकीय पोळी नेहमीच शेकत असतात ही बाब जगजाहीर आहे. म्हणुनच केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, गुन्हेगारी प्रकरणांमध्ये दोषी ठरलेल्या राजकारण्यांना शिक्षा भोगल्यानंतर आयुष्यभर निवडणूक लढण्यापासुन रोखता येणार नाही.यात संपूर्णपणे राजकीय पुढाऱ्यांचा व राजकारण्यांचा स्वार्थीपणा स्पष्ट दिसून येतो.जर एखाद्या सरकारी कर्मचाऱ्यांला दोषी ठरवण्यात आले,तर तो आयुष्यभर सेवेबाहेर रहातो,मग दोषी व्यक्ती संसदेत कशी काय येऊ शकते?कायदे मोडणारे कायदे कसे बनवू शकतात? सध्याच्या कायद्यानुसार,जर एखाद्या व्यक्तीला फौजदारी प्रकरणात २ वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा झाली तर शिक्षा पूर्ण झाल्यानंतर ६ वर्षांच्या कालावधीसाठी त्याला निवडणूक लढवण्यास मनाई आहे. एवढे असुनही राजकारण्यांची मनमानी दिसून येते.विद्यार्थी, बेरोजगार युवक व अन्य संघटना यांनी मोर्चे काढले यांच्यावर जेव्हा गुन्हा दाखल होतो तेव्हा हाच गुन्हा पोलिस व्हेरिफिकेशनमध्ये आड येतो अशा परिस्थितीत त्या युवकांना आपल्या कॅरीअर पासुन वंचित राहावे लागते हा त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर मोठा आघात व प्रहार पडतो.परंतु राजकारण्यांना मात्र राजकारण करण्यासाठी मोकळीक हवी असते त्या पध्दतीने कायदे वळवितात ही बाब सर्वसामान्यांसाठी व लोकशाहीसाठी घातक आहे असे मी समजतो.



राजकारणी मोठमोठ्या घोटाळ्यांनी व अनेक गुन्ह्यांनी लथपथ असतात तरीही त्यांचे राजकारण सुरळीत आणि सुखरूप सुरूच असते त्यामुळे यांच्यावर अंकुश असने गरजेचे आहे.याकरीता सर्वोच्च न्यायालय, महामहीम राष्ट्रपती यांना विनंती करतो की सर्वसामान्यांनप्रमाणेच राजकारण्यांना शिक्षा व कायद्याची संपूर्ण बंधने असायला हवे.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९**

# मुंबई महानगरपालिका मुद्रणालय ९० वा वर्षात पदार्पण

मुंबई महानगरपालिका मुद्रणालय १ मार्च १९३५ रोजी सुरू झालेले मुद्रणालय १ मार्च २०२५ रोजी ९० व्या वर्षांत पदार्पण करीत आहे.सुमारे १० हजार रुपयाच्या भांडवलावर सुरु झालेल्या छापखान्याचा विकास होत गेला.संगणकीकृत अक्षरजुळणी ,उद्धझ, प्रतिरूप ( ऑफसेट छपाई) यंत्रे आणि स्वयंचलित बांधणी यंत्राद्वारे काम चालते.सन २००२ पर्यंत छपाईच्या आणि दळणवळणाच्या अत्याधुनिक साधनांद्वारे मुद्रणालय सुसज्ज करण्याचा तत्कालीन व्यवस्थापक मधुकर कामत यांनी केला होता.९० वर्षातील प्रगतीच आढावा-

मुंबई महानगरपालिकेची रितसर स्थापना १८७२ झाली. तिच्या नागरी कामांना गती मिळाली.कामाच्या वाढत्या व्यापाबरोबर कार्यालयीन कामकाजासाठी वापरात आणावयाचे छापील फॉर्म्स, रजिस्टर, महानगरपालिका समित्यांचे प्रस्ताव-ठराव - सभावृतांत इत्यादी छापल्याबद्दल मागणी आणि वापर वाढू लागला,परंतू महानगरपालिकेचे मुद्रणालय असावे अशी जाणीव पालिका सदस्य अथवा अधिकर्यांना प्रकर्षांने होत नव्हती छपाईचे काम कंत्राटपद्धतीने खाजगी छापखान्यातून करुन घेतले जात होते.तसे पाहता ,पालिकेचा छापखाना असावा असा प्रस्ताव १९३५ पूर्वी दोनवेळा मांडण्यात आला होता.पण

छापखान्यासाठी लागणारी भांडवली गुंतवणूक पाच लाख रुपयांहून अधिक आहे,तसेच इंग्लंड मधील फारच थोड्या स्थानिक स्वराज्य संस्था आणि कंपन्यांकडे स्वतःचे छापखाने असूनही ते आपले बहुतांशी काम खाजगी कंत्राटदारांकडून करून घेत असतात,असा दाखला देऊन छापखान्याचा प्रस्ताव दोन्ही वेळा फेटाळण्यात आला.पालिका लेखा परीक्षकांनी सुचवले शाळा समितीच्या प्रेसमधून काही ठराविक फॉर्म्स छापून घ्यावेत. मुंबई महानगरपालिकेचा स्वतःचा छापखाना का असावा याचे समर्थन करताना टेस्ट ऑडीट ऑफिसर बी.के.वागळे यांनी आपल्या अहवालात वरील बाब नमूद केली.त्याचबरोबर त्यांनी महानगरपालिकेच्या विविध खात्यांना लागणारे फॉर्म्स - रजिस्टर यांची विगतवारी ,वार्षिक मागणी इत्यादी माहिती घेऊन पालिकेने स्वतःचे मुद्रणालय सुरू केल्यास ते वर्षभर कसे कार्यरत राहील याचे स्पष्टीकरण केले,आणि फुलस्केप आकारात छपाई करता येण्याजोगा विजेवर चालणार्या दोन ट्रेडल मशिन्स आणि इतर जोड यंत्रसामुग्री अशी एकूण दहा हजार खर्चाची योजना आयुक्तांना सादर केली.टेस्ट ऑडीट ऑफिसरांनी सादर केलेली योजना कमी खर्चिक असून या योजनेनुसार लहान आकाराची छपाईची कामे प्रस्तावित पालिका छापखान्यात तर उर्वरित कामे पूर्वीसारखीच खाजगी कंत्राटदारांकडून करून घेता येतील असे मत व्यक्त करून छापखान्याचा प्रस्ताव महापालिका आयुक्त एच.के.कृपलानी यांनी स्थायी समितीस सादर केला.चर्चेतून मुद्रणालयाच्या जागेचे भाडे ,इतर आनुषंगिक खर्चाचा आढावा घेऊन पालिका वार्षिक ४ हजार ३०० रुपयांची बचत करु शकेल ,असा स्थायी समितीने निष्कर्ष काढला आणि प्रस्तुत प्रस्ताव शिफारशीसह पालिका सभागृहाकडे मंजुरीसाठी पाठवला.सभागृहाने ' महानगरपालिका मुद्रणालय ' स्थापन करण्याचा ठराव २० सप्टेंबर १९३४ रोजी मंजूर केला( ठराव क्रमांक ३३६ )मध्यंतरीच्या काळात स्थायी समितीने १४ फेब्रुवारी १९३४ रोजी छपाईचे कंत्राट टाईम्स प्रेसला १ मार्च १९३४ ते २८ फेब्रुवारी १९३९ या पाच वर्षाच्या काळासाठी ठराव क्रमांक ९८३५ अन्वये दिले होते.परंतु कंत्राटाच्या अटीत छपाईचे कोणतेही काम ,कोणत्याही वेळेस पालिका आयुक्त त्यांच्या अधिकारात खात्यांतर्गत करवून घेऊ शकतात अशी अट अंतर्भूत असल्याने वरील कंत्राटाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच महानगरपालिका मुद्रणालय सुरु करण्यात कोणतीही आडकाठी येणार नव्हती.

**मुद्रणालयाची स्थापना**

मुंबई महानगरपालिका मुद्रणालय सुरु करताना नफा मिळवण्याचे उद्दिष्ट नसल्याने छपाईचा खर्च संबंधित खात्याकडून त्यांच्या मागणीच्या प्रमाणात वसुल करायचा असे ठरले.पूर्वीच्या इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट इमारतीच्या तळमजल्यावर दोन खोल्यांत मुद्रणालयाचा शुभारंभ १ मार्च १९३५ रोजी झाला.प्रेसला लागणारे कामगार रोजंदारीवर आणि आवश्यकतेनुसार घेतले जात या कामगारांना हंगामी कामगार म्हणून संबोधले जाई.

**प्रगतीचे टप्पे**

पहिल्या वर्षभरात २६ हजार ७५३ रूपयांचे काम मुद्रणालयाने केल्यानंतर मुद्रण खर्चात ७ हजार ३९८ रुपयांची बचत झाली.२२ फेब्रुवारी १९३६ रोजी २२ कामगार होते.पुढील वर्षांत ८,२६७ रुपयांची बचत झाली. फेब्रुवारी १९३७ अखेर २८ कामगार होते.मुद्रणालयाच्या तिसऱ्या वर्षी १९३७ -१९३८ एक लायनो टाईप (अक्षर जुळणी) यंत्र आणि सेंच्युरेट छपाई यंत्राची खरेदी ३०,०५० रुपयांस करण्यात आली,यामुळे फुलस्केप पेक्षा मोठ्या आकारातील छपाई कामे करता येऊ लागली.याच वर्षी अडीच लाख मतदारांची यादी आणि निवडणूक यादवच्या छपाईचे काम महानगरपालिका मुद्रणालयात करण्यात आले.दोन वर्षापूर्वी सुरू झालेल्या मुद्रणालयाने निवडणुकीचे काम पूर्ण करून देणे ही कौतुकास्पद बाब होती.प्रथम हस्त अक्षर जुळणी नंतर लायन्स - मोनो पद्धतीची यांत्रिक जुळणी १९८१ ते १९९४ पर्यंत फोटो टाईप सेटिंग (छाया अक्षर जुळणी )१९९४ पासून संगणकीकृत डेस्क टॉप पब्लिशिंग ( उद्धझ)तंत्र अशा चढत्या क्रमाने अक्षर जुळणीची वाटचाल. १९९५ - १९९६ मध्ये ५ डी.टी.पी.लेझर प्रिंटर बसवण्याची योजना.पुस्तक बांधणीचे आधुनिकीकरण. स्वयंचलित बांधणी यंत्राच्या जोडीस कागदी घडी यंत्र ,प्रोग्रॅमेटिंग यंत्र मुद्रणालय बसवले.मुंबई महापालिकेतील ४०० हून विभागाचे छपाईचे काम, लाखों प्रतींची छपाई, १५० हून अधिक कर्मचारी दोन सत्रात काम करीत आहेत. पालिकेची अर्थसंकल्पीय कामे, वार्षिक दिनदर्शिका,वार्षिक दैनंदिनी, रुग्णालयांची,महानगरपालिका सचिव कार्यालयाचे छपाईचे कामकाज, महानगरपालिकेतील विविध समित्यांच्या कार्यक्रम पत्रिका,सभावृत्तांत ,महापौर कार्यालयातील छपाईचे कामे अशी विविध कामे वेळेत पूर्ण करून देण्याचे छपाईचे काम मुद्रणालय व्यवस्थपन पार पाडीत आहे. मुंबई महानगरपालिका मुद्रणालयाने मुद्रण तंत्रज्ञान विविध स्थित्यंतरांसोबत आजवर उल्लेखनीय प्रगति केली आहे.

महादेव गोळवसकर
सेवानिवृत्त अधिकारी सचिव कार्यालय. ९८६९४७६२०९
**mahadeogolvaskargmail.com**

## संपादकीय

# महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

राज्यात महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विद्येचे माहेरघर आणि सुसंस्कृत शहर अशी ओळख असलेल्या पुण्यातील गजबजलेल्या आणि सर्वाधिक वर्दळ असणाऱ्या स्वारगेट बस स्थानकात एका सराईत गुन्हेगार असलेल्या नराधमाने बस स्थानकातच उभ्या राहिलेल्या शिवशाही बसमध्ये एका सव्वीस वर्षीय तरुणीवर बलात्कार केला. स्वारगेट सारख्या वर्दळीच्या बस स्थानकात घडलेल्या या घृणास्पद घटनेने संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. पुण्यासारख्या देशाच्या सांस्कृतीक राजधानीत आणि विद्येच्या माहेरघरात एका तरुणीची अब्रू लुटली गेल्याने पुण्यासारख्या सुसंस्कृत शहराची मान शरमेने खाली झुकली आहे. एकेकाळी पुणे हे मुलींसाठी सर्वात सुरक्षित शहर समजले जात होते मात्र मागील काही वर्षापासून पुण्याची ही ओळख पुसली जात आहे. या घृणास्पद घटनेने केवळ पुण्याचीच नव्हे तर पुरोगामी महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकली आहे. पुण्यात घडलेली ही महिला अत्याचाराची घृणास्पद घटना ही काय राज्यातील पहिली घटना नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात महिला अत्याचाराची एक तरी बातमी हमखास वाचायला मिळते. दोन वर्षापूर्वी पहाटे कामावरून घरी परतणाऱ्या एका संगणक अभियंता तरुणीवर रिक्षा चालकाने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पुण्यातीलच वानवडी परिसरात घडली होती. त्याआधी मुंबईतील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनीचा विनयभंग करून सुरक्षा रक्षकाने तिची हत्या केली होती. पुण्यातच एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनीची हत्या झाली होती. मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनसहुन वाशिकडे हार्बर रेल्वेने परीक्षेसाठी येणाऱ्या वीस वर्षीय तरुणीवर एका नराधमाने मज्जीद बंदर जवळ धावत्या डब्यातच लैंगिक बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपर्डी येथील निर्भयावर झालेल्या अत्याचाराने तर संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला होता.बदलापुरात चार वर्षीय चिमुरडीवर शाळेतच झालेल्या अत्याचाराने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता. बदलापुरची घटना तर मानवतेला काळीमा फासणारी होती. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात अशा घटनांची मालिकाच सुरू आहे. राज्यात महिला अत्याचाराची घटना घडली सर्वत्र संतापाची लाट उसळते. मोर्चे निघतात. निषेध व्यक्त होतो. इलेक्ट्रॉनिक मिडियात चर्चा होते. प्रिंट मीडियात अग्रलेख लिहिले जातात. राजकीय पक्ष एकमेकांवर आरोपांच्या फैरी झाडतात. शासनाकडून घटनेच्या चौकशीचे आणि पोलिसांकडून आरोपींना कठोर शिक्षा देण्याचे आश्वासन दिले जाते अर्थात घटना घडून गेल्यानंतर आरोपींना पकडुन शिक्षा देण्यापेक्षा महिला अत्याचाराच्या घटना घडूच नये यासाठी पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत. दिवसाढवळ्या महिलांची अब्रू लुटून त्यांची हत्या करण्याची नाराधमी प्रवृत्ती अलीकडे जोर धरू लागली आहे. दिवसाढवळ्या अशा प्रकारचे गुन्हे करण्याची हिंमत नराधमांमध्ये निर्माण होते याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा आणि राज्यातील सुरक्षा यंत्रणांचा धाक राहिला नाही. आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही. पैशाच्या जोरावर आपण कायदा आणि सुरक्षा यंत्रणांना आपण वाकवू शकतो अशीच धारणा या नराधमांची झाली आहे म्हणूनच ते असे मानवतेला काळिमा फासणारे कृत्य करत आहेत. शिव, शाहू फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना शोभणीय नाहीत. पुरोगामी महाराष्ट्रालाशरमेने खाली मान घालायला लावणाऱ्या या घटना आहेत. महिलांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता वाढू लागली आहे हीच मानसिकता यामागे कारणीभूत आहे. आज राज्यातील कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वतःचे घर इतकेच काय तर पोलीस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पूर्वी अशा घटनांसाठी बिहार आणि उत्तरप्रदेश ही राज्ये प्रसिद्ध होती आता त्यात महाराष्ट्राची भर पडते की काय अशी शंका येऊ लागली आहे. महाराष्ट्राचा बिहार, उत्तरप्रदेश होऊ नये यासाठी सरकारने आणि पोलीस दलाने महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात तसेच संबंधित गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या नराधमांना फाशीचीच शिक्षा द्यायला हवी तसे झाले तरच राज्यातील महिला अत्याचाराच्या घटनांना आळा बसेल आणि पुरोगामी महाराष्ट्र ही महाराष्ट्राची ओळख कायम राहील.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# जालना आणि बदनापूर बाजार समितीचा निवडणूक कार्यक्रमाला स्थगिती




**जालना । प्रतिनिधी -** येथील बाजार समितीचं विभाजन करून जालना आणि बदनापूर या दोन बाजार समिती अस्तित्वात आल्या आहेत.जिल्हा उपनिबंधकांच्या आदेशावरून ६ जून २०२२ रोजी या दोन बाजार समिती अस्तित्वात आल्या आहेत.या दोन्हीही बाजार समित्यांचा निवडणूक कार्यक्रम ४ फेब्रुवारी २०२५ ला जाहीर करण्यात आला होता.मात्र बाजार समितीच्या विभाजनाबाबत उच्च न्यायालयात रीट याचिका दाखल करण्यात आलीय.त्यामूळे भविष्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी जालना आणि बदनापूर या दोन्हीही बाजार समित्यांच्या निवडणूक कार्यक्रमाला स्थगिती देण्यात आलीय.या संदर्भात सहकार आणि पणन विभागाच्या उपसचिवांनी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सचिवांना आदेश दिलेत.

## पान १ व ४ वरुन

## गोवंश चोरी ...

१५ लाख ५१ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, चंदनझिरा पोलीस ठाण्यात १७ फेब्रुवारी २५ रोजी अंकुश थोरात (रा. रॉयल नगर नवीन मोंढा) यांच्या फिर्यादीवरून तीन गाई अज्ञात चोरांनी चोरी केल्याबाबत गु.र.क्र ७१/२०२५ कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारमार्फत व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हेगार सिल्लोड येथे असल्याची माहिती मिळाली. यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सिल्लोड येथे या गुन्हेगारांचा शोध घेत त्यांना ताब्यात घेतले. यात शेख इस्माईल शेख इब्राहिम (वय २८) रा. सिटीएस नं. ९१, जाफरनगर, मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक, इस्तेयाक खान अल्ताफ खान, वय-२९ वर्ष, रा.घर नं. ८३५, गली नं.०७, गुलशेरनगर, मालेगांव, जि. नाशिक यांचा समावेश आहे. त्यांचे इतर दोन ते तीन साथीदार फरार असल्याचेही पोलीस प्रशासनाने सांगितले असून त्यांचा शोध पोलीस घेत आहेत. गोवंश चोरी करुन सिल्लोड येथे हे मांस विक्रीचा गोरखधंदा करतात अशीही माहिती पोनि श्री जाधव यांनी दिली आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीतांकडे गोवंश चोरीच्या गुन्ह्याबाबत चौकशी केली असता त्यांनी जालना जिल्ह्यातील नंदापूर शिवार, वरुड बुद्रुक शिवार, नांदखेडा शिवार, मोहळाई शिवार, सिपोरा बाजार, म्हसरुळ शिवार, जवखेडा खुर्द, जळगाव सपकाळ, कुकडी, पिंपळगाव शिवार, थिगळखेड शिवार या ठिकाणांहून रात्रीच्या वेळी जनावरे चोरी केली असल्याची कबुली दिली असून एकूण १९ गुन्हे उघडकीस आले आहेत. तसेच त्यांनी मालेगाव येथुन इनोव्हा कारमध्ये चोरुन आणलेले मोटार रिवायडींग कामी वापरण्यात येणारे तांबा क्वाईल, तार मिळून आले असुन सदरबाबत पोलीस ठाणे तालुका, मालेगांव, नाशिक येथे गु.र.क्र. १४१/२०२५ कलम ३३१(४), ३०५(१), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल आहे. तसेच आरोपीतांच्या ताब्यातुन मिळालेली होंडा युनिकॉर्न मोटार सायकल सुध्दा चोरीची असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदर मोटार सायकल पडेगाव येथुन चोरी केली असुन पोलीस ठाणे छावणी, छत्रपती संभाजीनगर येथे गु.र.क्र.३६/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल असल्याचे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी सांगितले आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ व सोबत स्थागुशाचे अमंलदार रामप्रसाद पव्हरे, प्रभाकर वाघ, रस्तुम जैवाळ, गोपाल गोशिक, रमेश राठोड, सागर बाविस्कर, कैलास खार्डे, इरशाद पटेल, सतिष श्रीवास, संदीप चिंचोले, रमेश काळे, सचिन राऊत यांनी केली आहे

## ६ महिन्यांपासून ...

युवक काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश सचिव सुरज यलगंठवार, बहुजन समाज पार्टी जालना विधानसभा अध्यक्ष राहुल करनाडे, विद्यार्थ्यी अजय राठोड, पवन सांगळे, सुशांत पजई, सुदर्शन राठोड व मोठय़ा संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## मराठवाड्यावर कायमस्वरुपी ...

आंतरराज्य नदीजोड प्रकल्पातून गूजरात कच्छ आणि गिफ्ट सिटी ला घेऊन जाण्याचे निश्चित केले असून, लोकसभेत खा अमोल कोल्हे आणि भास्कर भगरे यांनी महाराष्ट्रासह देशातील नदीजोड प्रकल्पा विषयी लिखीत प्रश्न विचारला होता . यावर जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी उत्तर देतांना सांगितले की, दमनगंगा -पिंजाळ (वापी, गुजरात जवळ काही किमी ) नदीजोड प्रकल्पाचा डीपीआर तयार आहे.

पार-तापी-नर्मदा नदीजोड प्रकल्पाचाही डीपीआर तयार आहे. हे दोन्ही प्रकल्प महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांतील आंतरराजीय आहेत. वस्तुस्थिती आणि तेथील भौगोलिक रचना अशी आहे की यापैकी एकाही आंतरराज्य प्रकल्पातून महाराष्ट्राला काहीच लाभ नाही ना सिंचन ना ऊद्योग ना शेती ! मुंबई साठी पिण्यासाठी काही पाणी मिळेल असे सांगितले जात असले तरी . त्यामुळे महाराष्ट्राच्या हिताला ठेंगा दाखवला आहे हे लोकसभेत उत्तरातून स्पष्ट झाले आहे.

म्हणजे पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी हे गाजरच आहे तर जायकवाडी चे पाणी टोकरून टोकरून कमी केले जात आहे! आणि तरीही आपण आत्ताही जागृत झालो नाही तर भविष्य आणि पुढची पिढी आपणास माफ करणार नाही म्हणून महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरण ने येत्या १५ मार्च पर्यंत मागवलेल्या हरकती आणि सुचनांवर मराठवाड्याच्या हितासाठी मोठ्या प्रमाणत शेतकरी, सहकारी साखर कारखाने महानगर/ नगर पालिका स्थानिक स्वराज्य संस्था, आमदार खासदार लोकप्रतिनिधी आजी माजी पदाधिकारी उद्योग व्यापार संघटना यांनी आक्षेप नोंदवावेत. असे आवाहन मराठवाडा अनुशेष निर्मुलन आणि विकास मंच चे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखेपाटील आणि सहकारी यांनी केले आहे.

पत्रकार परिषदेस सुभाष कोळकर, शरद देशमुख, यू.डी. देशमुख, माऊली कदम, राजेंद्र गोरे, डॉ. इनामदार उपस्थित होते.

# ठाकरे किडस् स्कुल येथे सायन्स लॅबचे उदघाटन



**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून ठाकरे किड्स स्कुल येथे सायन्स लॅब चे उदघाटन संजय टिकारिया यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री टिकारिया यांचे पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. सरस्वती पूजनानंतर लगेच सि. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर फीत कापून सायन्स लॅब व विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले.

यावेळी इयत्ता १ ली ते ६ वी चे विद्यार्थ्यांनी बॉडी पार्टस, पार्टस ऑफ प्लांट्स, विल्ड अनिमल्स, वॉटर अनिमल्स, पेट अनिमल्स, जल चक्र, थिंग्स वे गेट फ्रॉम प्लांट्स, आवर हेल्पर्स, डाळी व फ्रुटस, घरांचे प्रकार, ऋतू अनुसार कपडे, वायूचे थर, गाव व अन्नपदार्थ, जल शुद्धीकरण, ऑक्सिजन शिवाय आग विझते, पाण्याचा फुगा, धान्य, गाव व पिके असे ६५ प्रयोग सादर करण्यात आले.

टिकारिया यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व २ रुपयांच्या फुग्यापासून कमी खर्चात प्रयोग करता येतात. विद्यार्थ्यांनी रेडी मेड वस्तू न आणता स्वतः या वस्तू बनवल्या विद्यार्थी प्रयोग सादर करताना भारावून गेल्यासारखे वाटले असे ते म्हणाले व सर्व विद्यार्थ्यांना सायन्स हॉबी सेंटर च्या वतीने भेटवस्तू जाहीर केल्या. कार्यक्रमाचे सूत्र संचालन वैष्णवी पोट्टाबत्तीन यांनी केले तर आभार प्रदर्शन ठाकरे सरांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका सौ. रंजना ठाकरे यांनी तर सौ. राजश्री माचेवार, प्रतिक्षा कनकुटे ,वैष्णवी पोटाबत्तीन, रसिका दीक्षित, आदिती लोळगे, सोनाली सेवलकर, मिनाक्षी आलकोंडा, ममता आडेप, ज्योती अग्रवाल, मोनिका शहाणे व माधुरी नामदे आदींनी परिश्रम घेतले.

# स्वामी विवेकानंद महाविद्यालयात मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबीर संपन्न

**मंठा । प्रतिनिधी -** येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयामध्ये स्वातंत्रवीर वि.दा. सावरकर यांच्या पुण्यतीथी निमित्य प्रतिमेस पुष्पार्ण करून अभिवादन करण्यात आले . याप्रसंगी '' मरणोत्तर नेत्रदान जनजागृती या विषयावर डॉ. उज्वल गायकवाड .नेत्र चिकित्सक , शरयु मल्टिस्पेशालीटी हॉस्पीटल जालना यांनी सखोल मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करताना डॉ. उज्वल गायकवाड म्हणाले की मरणोत्तर नेत्रदान जनजागृती ही एक महत्वाची मोहीम आहे ज्याचा उद्देश नेत्रदानाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आहे. नेत्रदान ही एक पवित्र कृती आहे ज्यामुळे एका व्यक्तीच्या मृत्यूनंतर दुसऱ्या व्यक्तीला दृष्टी प्रदान करता येते. त्यांनी मरणोत्तर नेत्रदान जनजागृतीचे उद्दिष्टे सांगताना म्हणाले की नेत्रदानाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे,नेत्रदानाच्या महत्वाबद्दल लोकांना शिक्षित करणे, नेत्रदानासाठी लोकांना प्रोत्साहित करणे व नेत्रदानाची प्रक्रिया सुलभ आणि सोपी करणे ही आहे . तसेच मरणोत्तर नेत्रदान जनजागृतीसाठी काही उपाय सांगताना डॉ. उज्वल गायकवाड म्हणाले की शाळा आणि कॉलेजमध्ये नेत्रदानाबद्दल शिक्षण देणे गरजेचे आहे तसेच समुदायात नेत्रदाना बद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. याप्रसंगी डॉ. ज्ञानेश्वर जाधव , सर्जिकल हॉस्पिटल मंठा यांनी पण विद्यार्थ्यांना डोळ्याचे आजार व उपाय योजना या विषयावर सखोल मार्गदर्शन केले . कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ.



माणिकराव थिटे यांनी केले तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. वसंत जागृत यांनी केले व प्रस्थावना प्रा.डॉ. राजेश गायकवाड यांनी केले तर प्रा.डॉ. दक्षता देशमुख यांनी आभार प्रगट केले . या कार्यक्रमासाठी मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ परतुर संस्थेच्या अध्यक्षा मा श्रीमती आशाताई बाबासाहेब आकात , संस्थेचे सचिव मा. कपिल भैया आकात , उपअध्यक्ष मा डॉ. कुणाल दादा आकात यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी प्रा डॉ भरत धोत्रे, प्रा.डॉ. गजानन मुळे सर्व प्राध्यापक वृंद , शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

# लॉयन्स क्लब व जैन संघटनेतर्फे मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**जालना । प्रतिनिधी -** लॉयन्स क्लब ऑफ जालना व भारतीय जैन संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. मंगलचंदजी गणेशमलजी लुणिया यांच्या स्मृत्यर्थ मंगळवार दि. ४ मार्च रोजी ब्राह्मण गल्लीतील नंदी मंदिर येथे सकाळी ९.३० ते दुपारी २ या वेळेत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समाजात अनेक जण आर्थिक अडचणींमुळे डोळ्यांचे योग्य उपचार घेऊ शकत नाहीत. अशा गरजूंसाठी हे शिबिर म्हणजे संजीवनीच ठरणार आहे. अनुभवी नेत्रतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मोफत नेत्र तपासणी करण्यात येऊन, मोतीबिंदूचे निदान होणाऱ्या रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. या शिबिराचा जास्तीत जास्त गरजूंनी लाभ घ्यावा लाभ घ्यावा, असे आवाहन लायन्स क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्डा, सचिव मंजु श्रीमाली, भारतीय जैन संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष विनयकुमार कोठारी, जिल्हाध्यक्ष विजय जैन, शहराध्यक्ष तथा प्रकल्प प्रमुख राजेश लुनिया यांनी केले आहे.


# नगरसेवक प्रदीप बोराडे चषक स्पर्धात असीम २१ संघास प्रथम तर मुकेश ११ संघास द्वितीय पारितोषिक

**मंठा । प्रतिनिधी -** शिवजयंती निमित्त आयोजित नगरसेवक प्रदीप बोराडे क्रिकेट चषक स्पर्धेचे प्रथम विजेतेपद असीम २१या संघाने पटकावले असून द्वितीय पारितोषिक मुकेश ११ या संघाने पटकावले आहे.या स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांच्या हस्ते (ता.२६) गुरुवार रोजी पार पडला.या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे, नगरसेवक उबेद बागवान, पोलीस उपनिरीक्षक



माळवे,श्री कातकडे, बाळासाहेब घारे,दत्ताराव हातकडके,शामराव टाके,संजय बोराडे,इंजी.राहुल वानखेडे, निलेश जोजारे,कृष्ण हेलसकर, विनायक चव्हाळ,यांची उपस्थिती होती.उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नगरसेवक प्रदीप बोराडे आयोजित चषक क्रिकेट स्पर्धेचे हे दुसरे वर्ष असून या स्पर्धत विजेत्यांना व सर्व उत्कृष्ट खेळाडूंना बक्षीसांची वितरण करण्यात आले. या मध्ये असीम २१ संघास प्रथम,मुकेश ११ या संघास द्वितीय,अहमदपूरा ११ तृतीय तर तोरणा ११ या संघास चतुर्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.तर उत्कृष्ट फलंदाज म्हणून विजय बोराडे, उत्कृष्ट गोलंदाज सुबोध राठोड, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक संदीप जाधव,तर सामनाविर जुनेद पठाण यांना बक्षीसाचे वितरण करण्यात आले.या स्पर्धेत पंच म्हणून दिनेश अंभोरे,रवी काळे, राहुल बोराडे, सचिन चव्हाळ इमरान पठाण, रियाज शेख, शेख इल्लू, पंकज राठोड, संदीप डेंगळे, तानाजी मोरे, राजा चव्हाण, अब्दुल कुरेशी, इमरान बागवान, तसेच समालोचक म्हणून कयूम कुरेशी,विठ्ठल बोराडे,परवेज शेख, जुनेद पठाण यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कुणाल कमळकर, गोरख चव्हाण, हाफिज बागवान,शंकर कचरे, निलेश बोराडे, प्रवीण पंडित, सचिन घेणे योगेश बोराडे यांच्या सह कमितीतील सर्व पदाधिकाऱ्यांची व क्रिकेट प्रेमींची उपस्थिती होती.

# शिक्षक समृद्धी प्रशिक्षणाचा समारोप; केंद्रप्रमुख के.एम.धोत्रे यांचा सत्कार



**मंठा । प्रतिनिधी -** तालुकास्तरीय शिक्षक समृद्धी प्रशिक्षणाच्या दुसऱ्या टप्प्यातील दुसऱ्या सत्राचा २८ फेब्रुवारी रोजी समारोप गटसमन्वयक के.जी.राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. पाच दिवसीय प्रशिक्षणात तज्ञ मार्गदर्शक तथा सुलभक यांनी प्रशिक्षणार्थ्यांना बदलत्या शिक्षण धोरणात बद्दल सविस्तर माहिती दिली. त्याचप्रमाणे शांत, संयमी व अभ्यास व्यक्तिमत्व कन्या केंद्राचे केंद्रप्रमुख के.एम.धोत्रे वयतनियोमानानुसार २८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने त्यांचा गटसाधन केंद्रात सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बी.के.बोराडे, मुख्याध्यापक आर.पी. बोराडे, संतोष गिऱ्हे, केंद्रप्रमुख शिवाजीराव देशमुख, मुख्याध्यापक प्रमोद देशमुख, केंद्रप्रमुख डी.ए.चव्हाण, अभिमन्यू बायस, श्रीमती जे.पी.चव्हाण, श्रीमती विद्या पतंगे, प्रकाश वाहुळे, गंगाधर वानोळे, भाऊसाहेब जाधव, सचिन सोनटक्के, संतोष जागृत, आर.वाय.माने, जे.डब्ल्यू गुट्टे, पी.आर. घाडगे, पी.ए.सोनटक्के, एस. ए.बोधने यांच्यासह सुलभक व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# रोटरी रेनबोतर्फे महिला दिनानिमित्त रोटरी मिसेस आरोग्यवती स्पर्धा

**जालना । प्रतिनिधी -** विविध सामाजिक कार्यामध्ये सतत अग्रेसर असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोतर्फे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी रोटरी मिसेस आरोग्यवती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. महिलांचे स्वास्थ्य आणि त्याचे महत्त्व लक्षात घेऊन तपासणी व्हावी, महिलांमध्ये याबद्दल जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती क्लबचे अध्यक्ष महेश माळी यांनी दिली. नवीन आणि जुना जालन्यातील विविध हॉस्पिटलमध्ये ६ ते मार्च ८ मार्चदरम्यान लिपिड प्रोफाइल, ब्लड शुगर, एचबी, दंतचिकित्सा, बोन डेन्सिटी, बी एमआय इत्यादी तपासण्या केल्या जातील. ही स्पर्धा २५ ते ४०, ४० ते ६० आणि ६० वर्षापुढील अशा तीन वयोगटात घेतली जाणार आहे. स्पर्धा सर्व महिलांसाठी खुली असून, ५ मार्चपर्यंत नोंदणी करणे अनिवार्य आहे. नोंदणीसाठी नवीन जालना भागातील सॅफरॉन हॉटेल, साई डायग्नोस्टिक (डॉ. साबू) आणि जुना जालना भागातील टाऊन हॉलजवळील अथर्व डेंटल क्लिनिक, जालना येथे संपर्क साधावा. स्पर्धेतील विजेत्यांना एका भव्य समारंभात आकर्षक रोख बक्षिसे व ट्रॉफीज देण्यात येतील. सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे, अशी माहिती क्लबचे सचिव गौरव करवा यांनी दिली. या उपक्रमाचे प्रकल्प प्रमुख म्हणून डॉ. आरती मंत्री, रो. नेहा पाटणी, रो. आरती भक्कड व रो. डॉ. ममता मुंदडा काम पाहत आहेत. स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त महिलांनी सहभाग घ्यावा असे आवाहन रोटरी रेनबो क्लबच्यावतीने करण्यात आले आहे.

# आमदार संतोष दानवे यांची पंचायतराज कमिटीच्या अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** आमदार संतोष दानवे यांची पंचायतराज कमिटीच्या अध्यक्ष पदी निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार करतांना भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा तालुकाध्यक्ष जालना ग्रामीण मुकेश चव्हाण. अनिल सरकटे, दहिफळ उपसरपंच गोपाल चौधरी, दत्ताभाऊ जाधव, लासीराम राठोड, विकास कदम, दौलत भुतेकर, विकास चव्हाण, शुभम चव्हाण आदी उपस्थित होते.



# मराठी भाषा अभिजात बरोबर व्यावहारिक व्हायला हवी - सचिन परब

अभिजात मराठी भाषा ज्ञानभाषा व्हावी याचा प्रचार करण्यासाठी मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईने संकल्प केला आहे, अभिजात बरोबर ती अधिकाधिक व्यवहारी कशी होईल यासाठी प्रयत्न झाला तरच हे शक्य आहे. याचबरोबर कृत्रिम प्रज्ञा (एआय ) व्यवहारात मराठी अधिक उपयोगासाठी आणण्यासाठी त्याप्रमाणे मजकूर संगणकात लिहायला हवा असे विचार ज्येष्ठ पत्रकार सचिन परब यांनी व्यक्त केले. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, दादर सार्वजनिक वाचनालय आणि मराठी विचारधारा प्रतिष्ठान गोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कवी एकनाथ आव्हाड, कामगारनेते दिवाकर दळवी, संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे, चितळे उद्योगसमूहाचे राहुल जोगळेकर, दादर सार्वजनिक वाचनालयाचे सेक्रेटरी यतीन कामथे, मराठी विचारधारा प्रतिष्ठानचे विश्वस्त विकास होशिंग उपस्थित होते. या कार्यक्रमात संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ४९ व्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेतील मनोरंजनकार' का र मित्र स्मृती सर्वोत्कृष्ट अंक - नवलाई डोंबिवलीकर,निसर्गोत्सव कोल्हापूर सकाळ, संस्कार भक्तिधारा, कालनिर्णय, कोकणसाद, शब्दशिवार,सृजनदीप, पुढारी दीपस्तंभ, चांगुलपणाची चळवळ, नवाकाळ, मीडिया वॉच, उद्याचा मराठवाडा, नवभारत, कलासागर, द इनसाईट या उत्कृष्ट दिवाळी अंकांचा विविध पुरस्कार देऊन सचिन परब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मराठी भाषा व्यवहाराविषयी बोलताना ते पुढे असेही म्हणाले की, आज याठिकाणी भानुदास साटम सरांनी एआय तंत्रज्ञान मराठी भाषेसाठी किती उपयुक्त यावर व्याख्यान दिले. परंतु काही विषय या तंत्रज्ञानाला मंडतानाच येणार नाहीत. एखादी प्रत्यक्ष घटना घडल्यानंतर प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन केलेले रिपोर्ताज एआय कसे तयार करणार. संत तुकारामांच्या विषयी जगभरातील जवळ जवळ सर्व भाषांमधून लिहिले गेले आहे त्यामुळे त्यांची ओळख सर्वत्र झाली आहे. आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आणि मराठी भाषेची ओळख अथवा माहिती जगभर व्हावी असे वाटत असेल तर त्यासंबंधीचा मजकूर (कन्टेन्ट ) ऑनलाईन जायला हवा. आज व्यक्त होण्याची अनेक साधने निर्माण झाली आहेत. यापुढे आवश्यक तो इतर भाषेतून मराठीतून संवाद साधला तरच आपण काय म्हणतो आहोत हे इतरांना कळेल. म्हणजेच आपल्याला यापुढे मुलांच्या भाषेत बोलावे लागणार आहे. पूर्वीपासून आजपर्यंत कोणत्याही दैनिकातील संपादकीय पानावरील एक कोपरा व्यक्त होण्यासाठी सर्वसामान्यांसाठी हक्काचा आहे. त्या मंडळींची ही संस्था आहे, या संस्थेत आजपर्यंत अनेक दिग्गज मान्यवर येऊन गेले आहेत. मी सुद्धा स्वतःला भाग्यवान समजतो. फुलामुलांत रमणारे लेखक प्रसिद्ध बालसाहित्यिक आणि साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक एकनाथ आव्हाड आपल्या भाषणात म्हणाले की, पुस्तकं माणूस जोडण्याचे काम करतात, म्हणूनच आपण पुस्तकांना आपले मित्र म्हणतो. लेखकांची आणि पुस्तकांची ताकद मोठी असून दर्जेदार पुस्तकांच्या वाचनामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार मिळतो. पुस्तकांशी मैत्री करा, स्वप्नं बघा, परंतु त्यासोबत एखादी कलाही जोपासा. कलेमुळे जीवनाचा खरा आनंद तुम्हांला मिळेल वाचनाचा छंद तुम्हाला जीवन कसं जगायचं ते शिकवेल.




ज्येष्ठ कामगार नेते दिवाकर दळवी यांनी मराठी भाषा, मराठी माणूस आणि सरकारचे मराठी भाषेविषयीचे धोरण याची अभ्यासपूर्ण मांडणी आपल्या भाषणात केली. रवींद्र मालुसरे यांनी अभिजात मराठी भाषा उपक्रमाचे स्वरूप आणि संस्थेच्या कार्याची ओळख प्रास्ताविक केले.उपस्थितीचे स्वागत प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर, सूत्रसंचालन कार्यवाह नितीन कदम, राजन देसाई, तर आभार प्रदर्शन दिगंबर चव्हाण यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी अध्यक्ष विजय नाकदम, मनोहर साळवी, सुनील कुवरे, कार्याध्यक्ष रमेश सांगळे, कोषाध्यक्ष आत्माराम गायकवाड, आबास आतार यांनी विशेष मेहनत घेतली.

# मराठवाड्यावर कायमस्वरूपी अन्यायकारक ठरणारा मांदांडे समितीच्या अहवाल विरोधात जनजागृती अभियान - डॉ संजय लाखे पाटील

**जालना । प्रतिनिधी -** समन्यायी पाणीवाटप धोरणाचा पुनर्विचार करण्याच्या बहाण्याने राज्यसरकारने स्थापन केलेल्या 'गोदावरी अभ्यासगट क्र.०२ च्या समितीने श्री. प्रमोद मांदाडे (महासंचालक मेरी, नाशिक) यापूर्वीच्या क्र.०१ च्या मेंढेंगिरी समितीने जायकवाडी प्रकल्पात पावसाळ्यानंतर ६५ टक्के जलसाठ्याची अट निश्चित केली होती नव्या मांदाडे समितीने ती तब्बल ७ टक्क्यांनी घटवून ५८ टक्के करण्याची शिफारस केली असून, तसा मराठवाड्यावर घोर अन्याय करणारा अहवाल राज्यसरकार कडे सादर केला होता आणि सदर अहवाल राज्यसरकारने मान्य करून चथठठ महाराष्ट्र राज्य जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाकडे (एम.डब्लू.आर.आर.ए.) पाठवला होता. आता MWRR ने तो अहवाल आपल्या संकेतस्थळावर टाकला असून, त्याचा अभ्यास केला असता त्या अहवालाने जायकवाडी मराठवाड्यावर कश्याप्रकारे अधिकचा अन्याय करता येईल याचा वस्तुपाठच या अभ्यास गटाने घालून देऊन जायकवाडी धरणात किमान ६५% पाणी पातळी राखण्याचे गोदावरी अभ्यास गट क.०१ ची बंधनकारक आणि वैध तरतूद मोडीत काढून आता त्यात कपात करून केवळ ५८% पाणीपातळी शिफारशीत केली असून त्यामुळे वरून सोडायच्या पाण्यात सरळसरळ ०८ टिएमसी पाणी कपात प्रस्तावित करण्यात आली असून यामुळे टंचाईच्या काळात तब्बल १ लाख हेक्टर सिंचनावर परिणाम होणार असून पिण्याच्या पाणीपुरवठा सर्व योजनांत १३ टक्के तर उद्योगांना/बिगर सिंचन १७ टक्के कपात होईल आणि पर्यायाने मराठवाड्याच्या तोंडचे, शेती, सिंचन, ऊद्योग व्यापार यासाठीचे पाणी पळवण्याचा हा घाट घातला आहे. असा गंभीर व वस्तुनिष्ठ आरोप मराठवाडा अनुशेष निर्मुलन आणि विकास मंच चे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखेपाटील यांनी केला असून मंदाडे समितीच्या अन्यायकारक शिफारशी संदर्भात पुढे बोलतांना त्यांनी सांगितले की, राज्यसरकारने नेमलेले 'मांदाडे' समितीचा अहवाल अनेक महिने दडवून ठेवला होता आणि तो सार्वजनिक न करताच त्याची मराठवाड्यावर अन्यायकारक अंमलबजावणी चालू करण्याचा राज्यातील सत्ताधाऱ्यांचा कुटील डाव होता. परंतु त्याविरोधात मराठवाड्यात तज्ञां मधे मोठ्या प्रमाणात पण दबक्या आवाजात चर्चा चालू झाल्या होत्या आणि त्यानंतर मी स्वतः जायकवाडी समन्यायी पाणीवाटप याचिकाकर्ता या नात्याने दि ०४/०२/२०२५ रोजी चथठठ ला एक ईमेल पाठवून अहवाल सार्वजनिक करा नसता जनजागृती करत आंदोलन करावे लागेल. प्रसगी न्यायालयात जावे लागेल असा इशारा दिल्यानंतर हा २८१/२८४ पानाचा 'गोदावरी स्टडी ग्रूप (२) चा म्हणजेच 'मांदाडे समिती'चा अहवाल' मागच्या आठवड्यात चथठठ ने आपल्या संकेतस्थळावर जाहीर केला आहे.! आणि यातून कश्या-अधिकच्या कारणाने जायकवाडीवर म्हणजे पर्यायाने मराठवाड्यावर अन्याय करता येऊ शकतो. याचा छान वस्तुपाठच नगर नाशिक चे कायम गुलाम असलेल्या राज्य सरकारच्या जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दाखवून दिला आहे! तो ही एकमताने.! आणि तो कसा? तर या अहवालातील त्यांच्या शिफारशी पैकी केवळ वानगीदाखल काही उदाहरणे पुढे देत आहे! म्हणजे सर्वांच्या लक्षात येईल!

जायकवाडी पाणीसाठा कधीचा गृहित धरायचा या अतिशय महत्वाच्या तारखेत बदल सुचवला असून परतीच्या पावसामुळे जायकवाडी ओव्हरफ्लो होऊ शकते अशी मेख मारली आहे. सध्या १५ ऑक्टोबर



ही बेस तारीख असून या तारखेला जायकवाडीत अपार्याप्त पाणीसाठा वरून पाणी सोडायच्या सुत्रांनुसार नियंत्रण आदेश जारी केला जातो. त्यात बदल प्रस्तावित केला आहे.!

जायकवाडी ५८ टक्के पाणीसाठा असेल तर वरून पाणी सोडण्यात येऊ नये आहे त्यातच भागवा असे प्रस्तावित आहे !

गोदावरी स्टडी ग्रूप (२) म्हणजे मंदांडे समितीने बाष्पीभवनाद्वारे तब्बल ६.७० टीएमसी (जायकवाडी विस्तीर्ण पाणीसाठ्यातून होणारे) बाष्पीभवन या अहवालात कमी करून टाकले आहे.! बरं गोदावरी स्टडी ग्रूप (१) मेंढेगिरी समिती आणि स्टडी ग्रूप (०२) मांदाडे समिती या दोन्ही समिती अहवालात जायकवाडी पाणी साठा / साठ्याचे प्रक्षेत्रावर पसरलेले पाणी सारखेच असताना या नवीन (मंदाडे समिती) अहवालात जायकवाडीत होणारे बाष्पीभवन अतिशय कमी दाखवले आहे. आणि त्याप्रमाणात पाणी कमी केले आहे आणि पहिली मेख मारली आहे.! मांदांडे समिती अभ्यास गटाने बाष्पीभवनाची मोजणी करताना फक्त एकाच वर्षाच्या आकडेवारीचा आधार घेतला असून २०१२ च्या पहिल्या मेंढेंगिरी समिती अहवालात आणि मुळ तरतूद ६६४.८३ चर्ली असतांनाच आणि तसे नियोजन परंपरागत होत असतांना आता नवीन अहवालात तेव्हढाच पाणीसाठा असताना बाष्पीभवन केवळ २०६. ६८ दलघमी होत आहे गृहीत धरले आहे आणि हातचलाखी करून तेव्हढे पाणी कमी करत सरळ ६.७० ील पाण्यावर घाला घातला आहे!म्हणजेच २०१२ नंतर जायकवाडी पाणीसाठ्यावर 'ऊन्हात नाही तर थंडीत वाढ' झाली आहे असे अजब तर्कट लावले असून त्यापोटी पाणीकपात सूचवली आहे.

CarryšOver उन्हाळी हंगामात पाणी शिल्लक राहील'च नव्हे त्यासाठी अधिकचा साठा आहे असे गृहीत धरून त्यांनी नियोजन केले आहे. म्हणजे उन्हाळी पाळ्या न सोडता धरणातच पाणी अतिरिक्त साठवून ठेवून तो पाणी साठा पुढच्या वर्षात पावसाळ्यात लरीू षेीुरीव करून तेव्हढे पाणी कमी सोडायचे असा हा हलकट डाव आहे.! म्हणजेच जायकवाडीत जूननंतर पाणी शिल्लक राहील तोच 'निभावणी-साठा'. कसा तर उन्हाळी पाणी आवर्तन कमी करून! उन्हाळ्यात सिंचनासाठी पाणी सोडले नाही तरच ना? तोच निभावणी साठा असे गृहीत धरून या मांदाडे समितीने नियोजन सुचवले असून ते अतिशय चुकीचे, अन्यायकारक तर आहेच पण जायकवाडी लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना पुढे भविष्यात काय वाढवून ठेवले आहे. याचा हा अती ऊत्कृष्ट नमुनाच आहे! मुळात जायकवाडीच्या पाणी वापराच्या फेरनियोजनात लरीू`प निभावणी साठा अशी तरतूद नसताना जायकवाडीसाठी किमान लागणाऱ्या पाणीसाठ्यातून ३८१ दलघमी म्हणजेच तब्बल १३.४८ टीएमसी पाणी वगळण्याची शिफारस केल्याचे दिसून येत आहे. तसेच वरच्या भागात क्षमतेपेक्षा आणि बच्छावत आयोग आणि तद्नंतर विविध न्यायालयीन निवाड्यातून जायकवाडी धरणाच्या वरच्या भागात परवानगीच्या दुपटीने धरणे बांधली असून तेव्हढा अवैध पाणीवापर दांडगाई ने प्रस्थापित केला असून त्यामुळे जायकवाडी हे प्रचंड तुटीचे धरण बनले असून ते दरवर्षी भरत नाही! त्यामुळे हा असा साठा वजा करणे योग्य नाहीच पण् अतिशय अन्यायकारक आहे! कमांड क्षेत्रतील शेती - सिंचन च नव्हे तर ऊद्योग रोजगार पिण्याचे उद्योगाचे पाणी कमी करून केवळ जायकवाडीवर अवलंबून असलेला संपूर्ण मराठवाडा विभाग उध्वस्त करणाऱ्या व येथील शेती, ऊद्योग नागरीकरण संपवून वाळवंट करणाऱ्या या शिफारशी आहेत! म्हणजे कमी बाष्पीभवन दाखवून ६..७० टीएमसी + carry on दाखवायचा साठा १३.४८ = १९ .१८ टीएमसी म्हणजे २० टीएमसी पाणी कमी करण्याचा हा अतिशय संतापजनक खेळ आहे हे आपण गंभीरपणे लक्षात घेणे आवश्यक आहे.!

मराठवाडा ही संतांची भूमी आहे आणि लोकप्रतिनिधी अद्याप आग्रही तर सोडा जागृत नाहीत.! त्यामुळे सर्वसामान्य सजग नागरिक, विविध सामजिक संघटना यांनी हजारोंच्या संख्येने यावर आक्षेप नोंदवले पाहीजेत/आरपारच्या लढाईसाठी तयार व्हायला हवे.! नसता आता आपण शांतच राहिलो तर नगर नाशिक कर कोरड्या जायकवाडीतच 'आयपीएल' चे सामने आयोजीत करण्यालाही कमी करणार नाहीत! कारण त्यांना काहीना काही खुसपट काढून जायकवाडीत पाणी येऊन द्यायचेच नाही ही वस्तुस्थिती आहे. तर दुसरीकडे राज्यसरकार पश्चिम वाहिनी नार पार अंबिका, औरंग्या, पिंजाळ या नाशिक च्या वर सह्याद्रीच्या डोंगररांगा मधून बारमाही वाहणाऱ्या आणि अतिशय विपूल पाणी असलेल्या नद्यातील तब्बल १५० टीएमसी पाण्यासाठी सुध्दा गोदावरी व जळगाव धुळ्याची गिरणा नदी पात्रात वळवण्याचे गाजर दाखवून, राणा भिम देवी घोषणा करत आहे पण प्रत्यक्षात अगदी उलट कृती करून महाराष्ट्राच्या अधिकारातले आणि नाशिक, अहिल्या नगर, मराठवाडा खानदेशला दुष्काळमुक्त करण्याची क्षमता असलेले १५० टिएमसी पाणी गोदावरी गिरणा मधे संपुर्णतः न वळवता.

दमणगंगा पिंजाळ प्रकल्पातून व पार तापी नर्मदा या पान २ वर

## युवा आदर्श

### पी ए ...

पीए अन् ओ एस डी
तावून सुलाखून नेमा
आंत सभ्य कार्यकर्ते
वरुनि परिधान निमा
महत्व मोठे विश्वासा
नको भ्रामक मुलामा
जी हुजूरी करणा-या
टाळ लाळाळू गुलामा
मध्यस्थ करे अस्वस्थ
वेळीचं जाणा अधमा
सावरणे अशक्य करी
भूकंप धक्का सदमा
हातात अनिर्बंध सत्ता
कशाला करावी तमा
कर्तव्य करी शून्यवत
अधम बनवेलं उत्तमा
बाहेर पडतात लफडे
चिकटे कुणा वहिमा
बदनाम संपूर्ण वस्ती
दुजांचा असो महिमा
मध्यस्थाच्या कामांचा
कोण काढणारं विमा
मिडीया बातमी नाचे
खेळती फुगडी झिम्मा
सुटून जाई नोकरशहा
आपला बनवून मामा
चक्रात सापडतो नेता
जनता ना करेलं क्षमा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.